• वर्ष : ०३ • अंक : ३४९ • पुणे • बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





११५ लाभार्थी दिव्यांगांना साहित्य वाटप

3



महिला शक्तीचा जागर
वार्षिक सभा उत्साहात

4

## ठळक बातम्या

### भंडारा डोंगरात चिमुकलीला सोडले

तळेगाव दाभाडे (आरंभ पर्व) : भंडारा डोंगर परिसरात दीड ते दोन वर्षांच्या चिमुकलीला सोडल्याप्रकरणी तिच्या आई-वडिलांविरुद्ध तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांनी केलेला बनावही उघड झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, "अजय प्रकाश यादव (वय २४, रा. शिंदे वासुली, ता. खेड) आणि खुशबू अजय यादव (वय २३, रा. शिंदे वासुली, ता. खेड, मूळ उत्तर प्रदेश) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर मुलगी एक-दीड वर्षांपूर्वी मुंबई येथे आढळल्याचा दावा या जोडप्याने प्राथमिक चौकशीत केला होता. मात्र अधिक चौकशीत हा बनावही उघड झाला आहे." या बाबत 'सकाळ'मध्ये सविस्तर वृत्त प्रसिद्ध झाले होते. "भंडारा डोंगर परिसरात सहा सप्टेंबरच्या दुपारी ही बालिका आढळली. तिच्या पालकांचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू होते.

### शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला वेग

सोलापूर (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्गासाठी पुणे विभागातील चार जिल्ह्यांमध्ये सुमारे सहा हजार २०० हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी संबंधित जमिनींची संयुक्त मोजणी करण्यात येणार असून, मार्च २०२७ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली. जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कामाचा आढावा घेण्यासाठी निरीक्षक म्हणून विभागीय आयुक्त तेली-उगले सोलापूर दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाबाबत माहिती दिली. शक्तिपीठ महामार्ग पुणे विभागातील चार जिल्ह्यांतून जाणार असून, या मार्गासाठी मोठ्या प्रमाणात खासगी जमीन संपादित करावी लागणार आहे. त्यासाठी सुमारे ६२०० हेक्टर क्षेत्र संपादनासाठी प्रस्तावित आहे. भूसंपादनासाठी आवश्यक प्राथमिक प्रक्रिया पूर्ण करून संयुक्त मोजणीला सुरुवात करण्यात येणार आहे. जमीनधारकांचे लक्ष भरपाईकडे महामार्गासाठी मोठ्या प्रमाणात जमीन संपादित होणार असल्याने संबंधित जिल्ह्यांतील जमीनधारकांचे प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.

### कात्रज-कोंढवा रस्ता ठरतोय मृत्यूचा सापळा

पुणे (आरंभ पर्व) : रखडलेले रुंदीकरण, ठिकठिकाणी सुरू असलेली कामे, खड्डे आणि अवजड वाहनांची बेदरकार वाहतूक यामुळे कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण नागरिकांच्या जिवावर उठले आहे. गेल्या साडेचार वर्षांत कात्रज चौक ते खडीमशिन चौक या अवघ्या साडेतीन किलोमीटर मार्गावर तब्बल ५१ अपघातांची नोंद झाली असून, त्यात २१ जणांचा मृत्यू झाला आहे. सिल्व्हर ओक सोसायटीसमोर झालेल्या अपघातात १५ वर्षीय विद्यार्थिनीचा बळी गेल्याने या रस्त्यावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# दशावताराच्या रंगात रंगले पुणेकर

## कलाकारांनी जिंकली मने : कोकणच्या आठशे वर्षांच्या लोकपरंपरेचा जागर; गृहराज्यमंत्र्यांकडून कौतुक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पौराणिक कथानक, पारंपरिक वेशभूषा, रंगभूषा, प्रभावी संवादफेक, संगीत आणि दमदार अभिनय अशा विविध पैलूंनी सजलेल्या दशावताराने पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले. कलाकारांनी आपल्या उत्स्फूर्त अभिनयातून पौराणिक व्यक्तिरेखा आणि प्रसंग जिवंत केले. पारंपरिक लोककलेचा हा आविष्कार पाहताना नाट्यरसिकांना कोकणच्या सांस्कृतिक मातीशी जोडले जाण्याचा अनुभव मिळाला. या सादरीकरणाला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या अभिनयाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. आनंदनाथ ट्रस्ट आणि राष्ट्रप्रथम ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित महोत्सवात कोकणातील तब्बल आठशे वर्षांची परंपरा लाभलेल्या दशावतार लोकनाट्याचे पुण्यात प्रथमच सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याचे



गृहराज्यमंत्री योगेश कदम, अभिनेत्री तथा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, शिवसेनेचे उपनेते इरफानभाई सय्यद, पुणे दहीहंडी महोत्सवाचे अध्यक्ष व महोत्सवाचे संयोजक वैभव वाघ, उपाध्यक्ष अथर्व पिसाळ, आनंदनाथ ट्रस्टचे विश्वस्त अनिल बटाणे आदी उपस्थित होते. योगेश कदम यांनी या अनोख्या दहीहंडी महोत्सवाचे कौतुक केले. योगेश कदम म्हणाले, "दहीहंडीच्या जल्लोषाला कोकणच्या समृद्ध लोककलेची जोड मिळाल्याने पुणे दहीहंडी महोत्सवाला यंदा वेगळेच सांस्कृतिक रूप लाभले. दशावतार ही केवळ मनोरंजनाची कला नसून, कोकणच्या लोकजीवनाशी आणि श्रद्धा-परंपरांशी जोडलेली सांस्कृतिक ओळख आहे. अनेक पिढ्यांनी जपलेली ही कला पुण्याच्या व्यासपीठावर सादर झाल्याने तिच्या संवर्धनाच्या दृष्टीनेही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले. अशा स्वरूपाचे सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात पुणे शहराने नेहमीच पुढाकार घेतला आहे." नीलम शिर्के सामंत म्हणाल्या, "दहीहंडी म्हटले की गोविंदा पथके, मानवी मनोरे आणि जल्लोषाचे वातावरण हे चित्र डोळ्यांसमोर येते. मात्र, या उत्सवाला लोककलेची जोड देत आयोजकांनी 'दहीहंडीच्या जल्लोषात सांस्कृतिक जागर' घडवून आणला. कोकणातील आठशे वर्षांची परंपरा असलेला दशावतार प्रथमच पुण्यात सादर करून लोककला आणि आधुनिक उत्सव यांचा सुंदर संगम साधण्यात आला.

> लोककलांना मोठ्या व्यासपीठावर स्थान मिळाल्यास नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख होण्यास मदत होते. त्यातून पारंपरिक कलांना नवे रसिक मिळतात आणि कलाकारांनाही प्रोत्साहन मिळते. याच भावनेतून पुणे दहीहंडी महोत्सवात दशावताराचा समावेश करण्यात आला. कोकणची आठशे वर्षांची परंपरा पुणेकरांच्या साक्षीने नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न ठरला, असे वैभव वाघ यांनी प्रास्ताविकात सांगितले.

# राजगुरूनगरला श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

*गोकुळामध्ये श्रीकृष्ण आला ।*
*नंदाच्या घरी आनंद झाला ।*
*गुढ्या तोरणे शिखरी बांधिती।*
*कुसुमांचे हार देव वर्षती ।*
*जो बाळा जो जो रे जो ॥*

अशी सुरेल पाळणा गीते म्हणत येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळाच्या ज्ञान मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी करण्यात आली. श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त येथे जन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध कार्यक्रम उत्साहात साजरे झाले. प्रतिवर्षीप्रमाणे श्रीकृष्ण जन्मानिमित्त ज्ञान मंदिरात सायंकाळी हरीपाठ, आरती, रात्री एकविरा भजनी मंडळाचे सामुहीक भजन आदी कार्यक्रम झाले. मध्यरात्री बारानंतर श्रीकृष्ण जन्माचे भजन, पाळण्यावर पुष्पवृष्टी, प्रसाद व त्यानंतर महीला भाविकांनी पाळणा गितांचे गायन केले. जन्मोत्सवानिमित्त महिलांनी फुगड्या खेळून आनंद व्यक्त केला. यावेळी परिसरातील



भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन ह.भ.प. नामदेव महाराज कहाणे, संभाजी थिगळे, विलास कहाणे, अनिल कहाणे, सुभाष भालेकर, भिलाजी पाकळे, विठ्ठल सांडभोर, दिलीप रसाळ, सचिन भालेकर, सुरेश घुमटकर, काका गुजराथी आदी भाविकांनी केले. कार्यक्रमासाठी नगरसेविका सुनंदा थिगळे व एकविरा भजनी मंडळाच्या महीला सेवेकऱ्यांनी सुरेल संगीत भजन गायन केले.

# ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवासाठी 'सोलापूर पॅटर्न'चा पुण्यात संवाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागरूक पुणेकर नागरिक समितीच्या वतीने ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी, सोलापुरात राबविण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती पुणेकरांना देण्यासाठी विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. 'उत्सव हवेत; कर्णकर्कश आवाज नको! ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाचा सोलापूर पॅटर्न' या विषयावर हा संवाद होणार आहे. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार तथा DJ मुक्त सोलापूर मोहिमेचे मुख्य प्रवर्तक सिद्धाराम पाटील यांची यावेळी विशेष मुलाखत होणार आहे. सोलापुरात संवादातून बदल घडवून आणण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रयत्नांचा अनुभव ते यावेळी मांडणार आहेत. हा कार्यक्रम गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्यातील केसरी वाडा (लोकमान्य हॉल), नारायण पेठ येथे होणार आहे. सोलापुरात राबविलेला उपक्रम पुण्यातही कसा राबविता येईल, याबाबत यावेळी चर्चा होणार आहे. 'जे सोलापुरात झाले, ते पुण्यातही होणारच!' असा संदेश देत संघर्षाऐवजी संवादातून ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाची दिशा ठरविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून सौरभ वीरकर, निलेश धायरकर आणि अशोक तिडके असून . पुणे इकॉलॉजिकल फाउंडेशन, सिद्धेश्वर मंदिर ट्रस्ट, लोकशाही जागर मंच, राष्ट्र प्रथम फाउंडेशन, सुराज्य स्वर्गीण प्रकल्प आणि समता प्रतिष्ठान (संदीप मोरे) हे या उपक्रमाचे सहभागी आहेत.

- **डीजे मुक्त सोलापूर मोहिमेचे मुख्य प्रवर्तक सिद्धाराम पाटील यांची यावेळी विशेष मुलाखत १० सप्टेंबर रोजी**

# पुण्याच्या अनियंत्रित शहरीकरणावर शुक्रवारी परिसंवाद

## वाढत्या बांधकामांना परवानगी, उंच इमारती, वाहतूक व पायाभूत सुविधांअभावी निर्माण झालेल्या प्रश्नांवर होणार चर्चा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे प्रतिनिधी : विद्येचे माहेरघर आणि शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना वाढत्या बांधकाम परवानग्या, बहुमजली इमारती, वाहतूक कोंडी, अपुरे रस्ते, सार्वजनिक प्रकल्प, उद्याने व क्रीडांगणांचा अभाव यामुळे शहराच्या सुनियोजित विकासासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पुण्याचा विकास नगररचना विभागाच्या निर्देशानुसार तसेच टीपी व डीपीच्या नियोजनानुसार होत आहे का, याचा आढावा घेण्यासाठी राजीव गांधी स्मारक समितीच्या वतीने एकदिवसीय चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ या वेळेत नवी पेठेतील पत्रकार भवन येथे हा परिसंवाद होणार आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



शहराचा विकास हा तेथील नैसर्गिक रचना, उपलब्ध पायाभूत सुविधा आणि पर्यावरणाचा विचार करून होणे आवश्यक आहे. पुण्याचा विकास नगर नियोजन विभागाने आखून दिलेल्या पद्धतीने होत आहे का, यासह यूडीसीपीआर आणि एचसीएमटीआरच्या अनुषंगाने शहराच्या विकासाचे नियोजन प्रत्यक्षात कितपत प्रभावी ठरले आहे, यावर परिसंवादात चर्चा होणार आहे. नैसर्गिक घटकांचा विचार करून पर्यावरणपूरक पद्धतीने शहराचा विस्तार होत आहे का, हाही महत्त्वाचा मुद्दा चर्चेत राहणार आहे.

सध्या शहरात मोठ्या प्रमाणावर बांधकाम परवानग्या दिल्या जात असून बहुमजली आणि उंच इमारतींची बांधकामे वेगाने सुरू आहेत. मात्र, त्याच तुलनेत अंतर्गत रस्ते, सार्वजनिक वाहतूक, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, उद्याने, क्रीडांगणे आणि इतर नागरी सुविधांचा विकास होत आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. बांधकाम परवानगी देण्याची सध्याची पद्धत नागरिकांच्या हिताची आणि शहराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेसाठी उपयुक्त आहे की समस्या अधिक तीव्र करणारी आहे, यावरही परिसंवादात विचारमंथन होणार आहे.

क्रेडाईच्या अहवालानुसार पुणे शहरात सध्या ९३ हजारांहून अधिक घरे विक्रीअभावी पडून असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत वाढत्या शहरीकरणाची गरज, बांधकाम क्षेत्राचा विस्तार आणि उपलब्ध नागरी पायाभूत सुविधांची क्षमता यांचा मेळ घालण्याचे मोठे आव्हान शहरासमोर असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नुकतेच पुणे शहरात सुमारे सहा हजार कोटी चौरस फुटांची नवीन बांधकामे होणार असल्याचे नमूद केल्याचे वास्तुविशारद मकरंद शेंडे यांनी सांगितले. एवढ्या मोठ्या प्रमाणात बांधकाम झाल्यास शहराच्या पायाभूत सुविधांवर त्याचा काय परिणाम होईल, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# कर्जमुक्ती योजनेत मच्छिमारांनाही समाविष्ट करा

## वाशिष्ठी मच्छिमार व्यवसायिक सहकारी संस्थेची शासनाकडे मागणी

- **आ. शेखर निकम यांनी मत्स्य व्यवसाय बंदरे विकास मंत्री ना. नितेश राणे यांना दिले निवेदन**

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

पारंपरिक मासेमारी व्यवसायावर उदरनिर्वाह करणाऱ्या मच्छिमारांना विविध नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांमुळे मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांनाही 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' मध्ये समाविष्ट करून कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी वाशिष्ठी मच्छिमार व्यवसायिक सहकारी संस्था, चिवेली यांच्या वतीने आ. शेखर निकम यांनी मत्स्य व्यवसाय बंदरे विकास मंत्री ना. नितेश राणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी चिपळूण पंचायत समितीचे माजी सदस्य पांडुरंग माळी, वाशिष्ठी मच्छीमार व्यवसायिक सह. संस्था, चिवेली या संस्थेचे चेअरमन प्रभाकर सैतवडेकर, विलास वाजे, गणेश साबळे आदी उपस्थित होते.



या निवेदनानुसार समुद्र तसेच खाड्यांमध्ये विविध पद्धतीने पारंपरिक मासेमारी करून मच्छिमार आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, गेल्या काही काळात मासेमारी व्यवसायासमोर अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. एलईडी मासेमारी, डिझेलच्या पुरवठ्याशी संबंधित अडचणी, नैसर्गिक आपत्ती यांसह खाडी परिसरातील जलप्रदूषण आणि अनधिकृत वाळू उपसा यामुळे मासेमारीवर मोठा परिणाम होत आहे.

मासेमारीचे उत्पन्न घटल्याने अनेक मच्छिमार कर्जबाजारी झाले असून, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. आर्थिक संकटामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांवरही टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येऊ शकते, अशी चिंता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. मच्छिमारांना शेतकरी दर्जा देण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह असून, त्याच धर्तीवर कर्जमुक्ती योजनेचा लाभही मच्छिमारांना मिळावा, अशी मागणी संस्थेने केली आहे. शासनाने मच्छिमारांच्या परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून कर्जमुक्ती योजनेत त्यांचा समावेश करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत, राज्य महसूल मंत्री योगेश कदम, आ. भास्कर जाधव यांना माहितीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. मच्छिमारांच्या आर्थिक अडचणींचा विचार करून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा मच्छिमार बांधवांकडून व्यक्त होत आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ मध्ये शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमार बांधवांनाही कर्जमाफीत समाविष्ट करावे, तसेच गोवळकोट ते करंबवणे खाडीतील साचलेला गाळ तात्काळ काढून द्यावा, या मागण्यांचे निवेदन बंदरे व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. नितेश राणे यांना देण्यात आले.

सुवर्णसंधी!
InDesign ऑपरेटरची गरज आहे!
मासिक पगार
आकर्षक पगार दिला जाईल



घरून काम (Work From Home)!
✓ अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा
✓ मासिक पगार (पात्रतेनुसार)
✓ इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान
✓ कामाचे लवचिक तास
संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२

## थोडक्यात पण महत्वाचे



### उच्छिलला शिक्षक दिन आणि गोपाळकाला उत्सव साजरा

जुन्नर (आरंभ पर्व) : आज शनिवार रोजी उच्छिल ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस व शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता ५ ते ७ वीचे विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून विविध विषयांतील घटक शिकवण्यास आनंदाने सहभागी होऊन आपले अनुभव व्यक्त केले. याबरोबर गोपाळकाला सण आनंदाने व मोठ्या उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांनी मनोरे रचून दहीहंडी फोडली. यावेळी उपस्थित शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता नवले, उपाध्यक्ष सागर बांबळे, सदस्य शिवाजी नवले, अशोक भालेराव,कांचन नवले, पालक सदस्य देवेश नवले तसेच विमल करवंदे, हिराबाई नवले, दिपाली खरमाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सुभाष मोहरे,स्मिता ढोबळे, आरती मोहरे यांनी केले.

### धायरीतील प्रगतशील शेतकरी रत्नकांत रायकर यांचे निधन



धायरी (आरंभ पर्व) : धायरी गावचे प्रगतशील शेतकरी श्री. रत्नकांत गंगाराम रायकर (वय ६३) यांचे शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने रायकर कुटुंबीयांसह नातेवाईक व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे. कृषी क्षेत्रात कार्यरत असलेले श्री. रायकर हे कुटुंबवत्सल व मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांनी आपला आधारवड गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. शिवसेना तालुका प्रमुख श्री. दत्तानाना रायकर यांचे ते वडील होते. रायकर कुटुंबीयांच्या दुःखात नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ सहभागी झाले असून, त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### ASUS कडून राजीव तलरेजा यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती




पुणे (आरंभ पर्व) : ASUS इंडियाने MSME क्षेत्रातील तज्ज्ञ आणि Quantum Leapचे संस्थापक राजीव तलरेजा यांची MSME विभागासाठी मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केली आहे. ASUS EXPERT SERIESच्या 'BUILT FOR WORRY-FREE BUSINESS' या वचनाला अधिक बळकटी देणे आणि भारतीय MSME क्षेत्राला तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने हे दीर्घकालीन सहकार्य करण्यात आले आहे. भारतातील MSME क्षेत्र हे रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाचे महत्त्वाचे इंजिन मानले जाते. या क्षेत्राचा विस्तार वेगाने होत असताना व्यवसायांसमोर तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक आव्हानेही आहेत. विशेषतः व्यवसायासाठी तयार केलेल्या संगणकांऐवजी सर्वसाधारण वापरासाठी उपलब्ध असलेल्या लॅपटॉपचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे ASUSच्या अभ्यासातून समोर आले आहे. व्यवसायांसाठी संगणक निवडताना टिकाऊपणा, कार्यक्षमता, अपग्रेड करण्याची क्षमता, बॅटरी बॅकअप, सुरक्षा आणि विक्रीनंतरची सेवा या बाबी महत्त्वाच्या असतात. या गरजा लक्षात घेऊन ASUSने EXPERT SERIES विकसित केली आहे. वाढलेले उत्पादनक्षम आयुष्य, कमी डाउनटाइम आणि एंटरप्राइझ-ग्रेड सुविधांमुळे व्यवसायांचा एकूण मालकी खर्च (TCO) कमी करण्यावर या मालिकेचा भर आहे.

### महाविद्यालयामधील गोंधळ प्रकरण, मनसे कार्यकर्त्यांना जामीन मंजूर

पुणे (आरंभ पर्व) : गणेशखिंड रस्त्यावर असलेल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये विनापरवानगी प्रवेश करीत तेथील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो काढून घेत कर्मचाऱ्यांना धमकी देऊन गोंधळ घातल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाच्या कार्यकर्त्यांना चतुःश्रृंगी पोलिसांनी अटक केली होती. आरोपी प्रशांत कनोजिया विक्रांत वसंत भिलारे आणि आशिष भालचंद्र साबळे यांना मे. प्रथमवर्ग नायदंडाधिकारी, पुणे यांचा जमीन मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपींना दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर आरोपींना पोलीस कोठडी देण्यात आली होती. आरोपींची न्यायालयीन कोठडीची आवश्यकता नसल्याचे तसेच आरोपी तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार असल्याचे तसेच आरोपी हे पुणे येथील कायमस्वरुपीचे रहिवासी असल्याचा युक्तिवाद आरोपींच्या वतीने करण्यात आला. सदर युक्तिवाद ग्राह्य धरून मे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे यांनी दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी आरोपी ना प्रत्येकी ₹५०,०००/- च्या वैयक्तिक बाँडवर व समान रकमेच्या जामिना वरती तसेच आरोपींना तपास अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार उपस्थित राहून तपासात सहकार्य करणे, अभियोजनाच्या पुराव्यात छेडछाड न करण्याच्या अटी वरती जामीन मंजूर केला. आरोपींच्या वतीने ॲड अमेय बलकवडे, ॲड विजय सिंह ठोंबरे ॲड सिद्धांत माळेगावकर ॲड. चैतन्य दीक्षित ॲड वैभव हाटकर ॲड ओंकार चव्हाण ॲड सुहैल बढे ॲड मुकुल महिंद्रकर यांनी कामकाज पाहिले.

### कोलंबोमध्ये जीतो प्रीमियर लीगचा दिमाखदार आंतरराष्ट्रीय शुभारंभ



पुणे (आरंभ पर्व) : जीतो प्रीमियर लीग (जेपीएल) 2026 चा कोलंबोमध्ये दिमाखदार आणि भव्य शुभारंभ झाला. जैन समाजाच्या क्रिकेटविश्वातील प्रवासाला नवी दिशा देणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. उद्घाटन सोहळ्याला क्रिकेट विश्वातील दिग्गज, नामवंत व्यक्तिमत्त्वे, जीतोचे वरिष्ठ पदाधिकारी, फ्रँचायझी मालक आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याने जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जीतो) च्या वाटचालीतील एका नव्या आणि महत्त्वाकांक्षी पर्वाची सुरुवात केली. या तारांकित सोहळ्याचे प्रमुख आकर्षण भारताच्या टी-20 विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार आणि जेपीएलचा ब्रँड ॲम्बेसेडर सूर्यकुमार यादव तसेच श्रीलंकेचा दिग्गज क्रिकेटपटू सनथ जयसूर्या हे होते.

# ११ सप्टेंबरपूर्वी जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर निर्णय घ्या

## अन्यथा मुंबईत आंदोलनाचा इशारा : धायरी फाटा येथे मराठा समाजाचे एकदिवसीय ठिय्या आंदोलन; मराठा सेवकांची मोठी उपस्थिती







**धायरी (दै. आरंभ पर्व)**

मराठा आरक्षणाच्या हक्काच्या लढ्यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अखिल धायरी गाव मराठा समाजाच्या वतीने सिंहगड रोडवरील धायरी फाटा येथे एकदिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले. आरक्षणाच्या मागणीसाठी धायरी परिसरातील मराठा समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत शासनाचे लक्ष वेधले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, या मागणीसाठी समाजबांधवांनी दिवसभर ठिय्या देत आंदोलन केले. यावेळी आरक्षणाच्या हक्कासाठी समाजाची एकजूट कायम असल्याचा संदेश देण्यात आला.

दरम्यान, ११ सप्टेंबरपर्यंत मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्यास मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे धायरी फाटा येथे झालेल्या या आंदोलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या आंदोलनात ॲडव्होकेट राजेश मिंडे, शिवाजीराव मते पाटील, मिलिंद भाऊ पोकळे, किशोर भाऊ पोकळे, नेताजी बाबर, ॲडव्होकेट राजेंद्र भुरूक, राजेंद्र बिऱ्हामणे, बाळकृष्ण वांजळे, सचिन चव्हाण पाटील, विजय भाऊ लायगुडे, अविनाश पोकळे, विलास पोकळे, सोनालीताई पोकळे, अभिषेक लायगुडे, संजय पोकळे, रोहन पोकळे, संतोष पोकळे, आप्पासाहेब बराटे, संतोष भाऊ भोगाडे पाटील, बाळासाहेब घुले, टिंकूशेठ वाल्हेकर, राजेश पोकळे, गौतम कांबळे, नितीन शेठ कटारिया, स्वातीताई गायकवाड, प्रवीण पाटील, प्राध्यापक भोसले, शिवाजीराव मानकर, ॲडव्होकेट सुरेश शिंदे, राजेंद्र पवार, गोरखशेठ वांजळे, नितीन वाघ, सचिन पासलकर, शिवसेना शहर प्रमुख वसंत तात्या मोरे, बाळासाहेब भोरे यांच्यासह अनेक मराठा सेवक सहभागी झाले होते. शासनाने मराठा आरक्षणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून समाजाच्या मागण्या मार्गी लावाव्यात, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पुण्यात रंगणार 'ग्लोबल गणेश वाट'



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या समृद्ध गणपती परंपरेचा इतिहास, संस्कृती आणि वारसा जगभरातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने संस्कृती तर्फे भारतातील पहिली गणपती सांस्कृतिक खजिना शोध स्पर्धा 'ग्लोबल गणेश वाट' आयोजित करण्यात आली आहे. गणेश चतुर्थीच्या वीकेंडला, १९ व २० सप्टेंबर रोजी पुण्यात ही अनोखी स्पर्धा रंगणार आहे. अशी माहिती संस्कृती संस्थेचे निसर्ग उदेशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धेत आठ देशांतील सहभागी एकाच वेळी पुण्याच्या गणपती संस्कृतीशी जोडले जाणार आहेत. कुटुंबे, विद्यार्थी आणि नागरिकांना श्रद्धा, इतिहास व परंपरेवर आधारित विविध सांस्कृतिक सुगावे उलगडत जे. एम. रोडच्या सुमारे पाच किलोमीटर परिसरात खजिना शोधावा लागणार आहे. विशेष म्हणजे स्पर्धेची सुरुवात आणि सांगता जे. एम. रोडवरच होणार आहे. 'ग्लोबल गणेश वाट'चे प्रमुख आकर्षण म्हणजे पुणे ते फुकेत असा निर्माण होणारा सांस्कृतिक दुवा. स्पर्धेतील विजेत्यांना थायलंडमधील फुकेत येथील श्रीमंत गणपती बाप्पा देवळाई येथे कुटुंबासह सहलीची संधी मिळणार आहे. पुण्यातील दगडूशेठ गणपती मंदिर आणि फुकेतमधील गणपती प्रती दगडूशेठ या दोन गणपती परंपरांना जोडण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे.

## नगरसेवक हरिदास चरवड यांचा रक्षाबंधनाचा अनोखा उत्सव

### २५ वर्षांची सामाजिक बांधिलकी; महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचीही दखल







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी पहाटेपासून रस्त्यावर उतरून, नागरिकांच्या आरोग्यासाठी दिवसरात्र मेहनत घेणाऱ्या स्वच्छता दूत बहिणींसोबत रक्षाबंधनाचा सण आपुलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. नगरसेवक हरिदास चरवड यांच्या माध्यमातून गेल्या २५ वर्षांपासून जपली जाणारी ही सामाजिक बांधिलकीची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. स्वच्छता दूत बहिणींच्या हस्ते राखी बांधून घेत त्यांच्या कार्याप्रती सन्मान, कृतज्ञता आणि बंधुभाव व्यक्त करण्यात आला. शहर स्वच्छ ठेवणाऱ्या या भगिनींच्या हातातील झाडू केवळ कचरा दूर करत नाही, तर पुणेकरांच्या आरोग्याचेही रक्षण करतो. ऊन, पाऊस, थंडी आणि प्रतिकूल परिस्थितीतही आपले कर्तव्य बजावणाऱ्या या स्वच्छता दूत बहिणींच्या योगदानाची जाणीव या उपक्रमातून अधोरेखित झाली. रक्षाबंधनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला सलाम करताना त्यांच्या अडचणी आणि प्रश्नांकडेही लक्ष देण्यात आले. दरम्यान, यावेळी उपस्थित महिला कर्मचाऱ्यांनी सिद्धिविनायक ग्रुपच्या व्यवस्थापनाबाबत नाराजी व्यक्त करत आपल्या तक्रारी मांडल्या. दैनंदिन कामकाजातील अडचणी, आवश्यक सवलती आणि महिला कर्मचाऱ्यांच्या सोयी-सुविधांबाबत त्यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी नगरसेवक हरिदास चरवड यांनी संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनाला महिला कर्मचाऱ्यांना आवश्यक सवलती द्याव्यात, अशी सूचना केली. महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची दखल घेत त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. रक्षाबंधनाचा हा सोहळा केवळ राखी बांधण्यापुरता मर्यादित न राहता स्वच्छता दूत बहिणींच्या सन्मानासोबतच त्यांच्या प्रश्नांची दखल घेणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला. शहर स्वच्छ ठेवताना स्वतःच्या आरोग्याची आणि कुटुंबाचीही काळजी घेणाऱ्या या भगिनींच्या योगदानाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. या वेळी पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाचे आरोग्य निरीक्षक आशिष सुपरनार, शुभम डोळस, संदीप खेरडे, आरोग्य विभागाचे मुकादम अशोक साठे, गणेश भालशंकर, आप्पा सातपुते, महेश लोंढे, सिद्धेश गरड, तसेच सामाजिक कार्यकर्ते संदीप चरवड, ज्योती पवार, अनंता भोईर, तुषार पोकळे, चंद्रकांत पवळे, सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## खेळाडू घडविण्यासाठी कोमल नवले यांचा ५० लाखांचा निधी

### अटल बिहारी वाजपेयी क्रीडा संकुलातील उर्वरित कामांचे भूमिपूजन; तापकीरांच्या हस्ते कार्यक्रम




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

परिसरातील युवकांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची संधी मिळावी, खेळाडूंना दर्जेदार क्रीडा साहित्य उपलब्ध व्हावे आणि या भागातून चांगले खेळाडू घडावेत, या भावनेतून नगरसेविका सौ. कोमल सारंग नवले यांनी अटल बिहारी वाजपेयी क्रीडा संकुलासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून होणाऱ्या उर्वरित कामांचे भूमिपूजन आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले.

राजयोग सोसायटी रोड, धायरी येथील क्रीडा संकुलात झालेल्या या कार्यक्रमामुळे परिसरातील खेळाडू आणि नागरिकांच्या अपेक्षांना बळ मिळाले आहे. क्रीडा संकुलातील उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना अधिक चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणार असून, युवकांना खेळाच्या माध्यमातून प्रगती करण्यास मदत होणार आहे. "आपल्या भागातील मुलांना आणि युवकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, त्यांनी खेळात प्रगती करावी आणि भविष्यात चांगले खेळाडू घडावेत," या उद्देशाने क्रीडा उद्यानासाठी निधी देण्यात आल्याचे यावेळी नगरसेविका सौ कोमल नवले यांनी सांगितले.

आमदार भीमराव तापकीर म्हणाले, "क्रीडा संकुलातील उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतर या भागातील खेळाडू आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील. युवकांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी अशा विकासकामांना निश्चितच चालना देण्यात येईल."

दरम्यान, आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त सुंदर संस्कृती सोसायटी, वडगाव खुर्द येथे नगरसेविका कोमल नवले यांच्या आयोजनातून व निधीतून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सोसायटीच्या सदस्यांनी दवाखान्यासाठी आरक्षित असलेला भूखंड नागरिकांसाठी मैदान म्हणूनच कायम ठेवावा, अशी मागणी केली. त्यावर आमदार तापकीर यांनी आगामी काळात हा प्लॉट निश्चितपणे ओपन राहील, अशी ग्वाही दिली.

या वेळी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले,नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका जयश्री भूमकर, भाजपा मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, गंगाधर भडावळे, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे, सारंग नवले, उद्योजक सुरेश धर्मावत, तुषार श्रीहरी पोकळे, गणेश पोकळे, जयश्री पोकळे, सुमित बेनकर , अमोल अभ्यंकर , सचिन शिंदे, तसेच सर्व पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे स्थलांतर नको




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे प्रस्तावित स्थलांतर न करता गोयल गंगा, सिंहगड रोड येथील सध्याचे कार्यालयीन ठिकाण कायम ठेवावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष खडकवासला विभागप्रमुख महेश पोकळे यांनी पुणे महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. सिंहगड रोड, धायरी, वडगाव खुर्द, नऱ्हे, नांदेड, नांदोशी, किरकटवाडी, खडकवासला तसेच प्रभाग क्रमांक ३३ मधील कोंढवे-धावडे, शिवणे व उत्तमनगरपर्यंतच्या नागरिकांसाठी सध्याचे कार्यालय अधिक सोयीचे व मध्यवर्ती असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जन्म-मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, आधार कार्ड अपडेट तसेच विविध नागरी सेवांसाठी नागरिकांना या कार्यालयात वारंवार जावे लागते. त्यामुळे कार्यालयाचे स्थलांतर झाल्यास नागरिकांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि गैरसोय वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व्यक्ती तसेच ग्रामीण व उपनगर भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा अधिक त्रास होऊ शकतो, असे पोकळे यांनी म्हटले आहे.

# सणांच्या माध्यमातून सामाजिक वारसा जपावा : महापौर

### बालगोपाळांनी फोडली अनोखी 'सायकल दहीहंडी' : जेधे सोशल फाउंडेशन आणि इंद्राणी बालन फाउंडेशनचा उपक्रम

## गरजू विद्यार्थ्यांना ३०० मोफत सायकल वाटप




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"उत्सव हे सर्वांनी एकत्र येत आनंद घेण्यासाठी असतात. सणांच्या माध्यमातून सामाजिक वारसा जपायला हवा. समाजातील सगळ्या घटकांना एकत्र घेत आपण सण साजरे करण्याची परंपरा जपावी," असे प्रतिपादन पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे यांनी केले. राधे राधे... श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी... हाथी घोडा पाल की, जय कन्हैयालाल की... गोपालकृष्ण भगवान की जय... याचा जयघोष करत ढोलताशाच्या गजरात बालगोपाळांनी अनोखी अशी सायकल दहीहंडी फोडली.

जेधे सोशल वेलफेअर फाऊंडेशन व इंद्राणी बालन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवछत्रपती मित्र मंडळाच्या संयोजनातून शुक्रवार पेठेतील जेधे मॅन्शन, पंचमुखी मारुती मंदिर येथे या अभिनव सायकल दहीहंडीचे आयोजन केले होते. या निमित्ताने आंबेगाव व जुन्नर तालुक्याच्या दुर्गम भागातील ३०० गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील माळीण, अवसरी बुद्रुक, शिरोली, नारायणगाव, ओझर, भीमाशंकर, शिरोली खुर्द या अतिदुर्गम गावांमधील, तसेच पुण्यातील वस्ती भागातील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश आहे.

यावेळी व्यासपीठावर इंद्राणी बालन फाउंडेशनचे अध्यक्ष पुनीत बालन, अक्कलकोट राजघराण्याचे वंशज श्रीमंत मालोजीराजे तिसरे, भाजपाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव ॲड. वर्षा डहाळे, नगरसेवक अविनाश बागवे, गौरव बोराडे आणि जेधे सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व श्री शिव छत्रपती मित्र मंडळाचे अध्यक्ष कान्होजी दयानंद जेधे, जयराज वाडेकर, उमेश सपकाळ, निरंजन सोमवंशी, साईराज नाईक, साहिल भिंगे, मंगेश कोंढरे, प्रीतम परदेशी आदी उपस्थित होते. नादब्रम्ह आणि तालचक्र ढोलपथकांनी यावेळी आपल्या वादनाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. पुनीत बालन म्हणाले, "आजवर इंद्राणी बालन फाऊंडेशनतर्फे पुणे, सातारा व अन्य जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास आणि क्रीडा क्षेत्राशी निगडित ज्ञान मिळण्यास वेळ मिळावा, हा यामागचा उद्देश आहे. यंदा या अभिनव सायकल दहीहंडीच्या माध्यमातून ३०० सायकलींचे वाटप करताना आनंद होत आहे. जेधे सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून डीजेमुक्त व सामाजिक उपक्रमांनी ही दहीहंडी दरवर्षी साजरी केली जाते. अतिशय विधायक पद्धतीने सण, उत्सव साजरा करण्याची ही पद्धत भावली. ग्रामीण भागातील या बालगोपाळांच्या चेहऱ्यावरील सायकल मिळाल्याचा आनंद सुखावणारा आहे." कान्होजी जेधे म्हणाले, "सायकल दहीहंडी ही संकल्पना राबवणारे आमचे पहिलेच मंडळ आहे. जन्माष्टमी हा बाळगोपाळांचा सण असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शाळेत पोहोचण्याची अडचण लक्षात घेऊन आम्ही दहीहंडी हा उत्सव अनोख्या पद्धतीने साजरे करायचे ठरवले. सायकल दहीहंडीचे हे तिसरे वर्ष असून, यंदा ३०० विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. शाळेत जाण्यासाठी दळणवळणाची सुविधा उपलब्ध व्हावी आणि त्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला."

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवजन्मभूमी प्रतिष्ठानची दहीहंडी माऊली ग्रुप गोविंदा पथकाने फोडली

जुन्नर (आरंभ पर्व) : येथील शिवजन्मभूमी प्रतिष्ठानची दहीहंडी फोडण्याचा मान अवसरीच्या माऊली ग्रुप गोविंदा पथकाने मिळविला. दहीहंडी उत्सवाचे हे पाचवे वर्ष होते. जुन्नर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका समोर दहीहंडी उत्सव साजरा केला जातो. यावर्षी यात एकूण चार गोविंदा पथकांनी सहभाग भाग घेतला होता. माऊली ग्रुप गोविंदा पथकास मानाची ट्रॉफी तसेच रोख एक लाख अकरा हजार रुपये व सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सामाजिक बांधिलकी म्हणून शहरामध्ये किल्ले बनवणे, रांगोळी स्पर्धा, मोफत वह्यावाटप, किल्ले शिवनेरीच्या जवळपासच्या परिसरात कचरा टाकण्यासाठी डस्टबिन यासारखे सामाजिक उपक्रम प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी राबविण्यात येतात. यावेळी जुन्नर शहरांतील ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ.सी.जी कुलकर्णी, पी.आर. कुलकर्णी, निरगुडकर, लवाटे,सुनील शेवाळे तसेच पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड साहेब, मंडळाचे आधार स्तंभ सत्यवान बाळसराफ, देवदत्त ताजणे महाराज आदी मान्यवरांचा प्रतिष्ठानच्यावतीने सत्कार करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे गोविंदा पथकातील गोविंदाची काळजी घेण्यासाठी रेस्क्यू टीमच्या वतीने सर्व नियोजन करण्यात येते यावेळी विशेष आकर्षण म्हणून नऊ फुटाचा भव्य गोरिला आणण्यात आलेला होता. बालगोपालांना त्याचा उत्साहात आनंद घेतला. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रवी खिलारी, पंचायत समिती सदस्य संजय व्हाडी उत्सवाचे अध्यक्ष रुपेश जगताप,उपाध्यक्ष डॉ.स्वानंद देशपांडे, कार्याध्यक्ष निलेश चतुर, सचिव प्रशांत देवणे, सहसचिव संजय चिखले, खजिनदार सचिन कदम, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष देवराम लांडे, जुन्नरचे नगरसेवक अनिल रोकडे, सामाजिक कार्यकर्ते सुरज वाजगे, उद्योजक चंद्रकांत काजळे आदी मान्यवर सभासद व देणगीदार उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख ओंकार जोशी यांनी केले.



### वंध्यत्वाकडे सकारात्मक दृष्टिकोनाचा सामाजिक संदेश

पुणे (आरंभ पर्व) : क्रिस्टा आयव्हीएफ फर्टिलिटी सेंटरने आपला चौथा वर्धापनदिन साजरा करताना केवळ यशाचा उत्सव न मांडता समाजासाठी एक महत्त्वाचा सामाजिक संदेश दिला. अभिनेत्री जुई गडकरी यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात संस्थेने वंध्यत्व या विषयाकडे लाज किंवा नकारात्मकतेने न पाहता, ती एक वैद्यकीय समस्या असल्याचे अधोरेखित केले. आजच्या बदलत्या जीवनशैलीत अनेक दांपत्यांना पालकत्वाच्या प्रवासात अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी योग्य वैद्यकीय सल्ला घेणे हाच सकारात्मक मार्ग असल्याचे या सोहळ्यातून स्पष्ट करण्यात आले. मातृत्व ही केवळ महिलेची जबाबदारी नसून संपूर्ण कुटुंबाच्या भावविश्वाशी जोडलेला प्रवास आहे, हा विचारही यावेळी मांडण्यात आला. गेल्या चार वर्षांत संस्थेने ३० हजारांहून अधिक कुटुंबांना पालकत्वाचा आनंद मिळवून दिला. कार्यक्रमात या उपचारांतून यशस्वी झालेल्या अनेक दांपत्यांचा सन्मान करण्यात आला, ज्यांनी आपले भावनिक अनुभव व्यक्त करत संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. डॉक्टर, समुपदेशक आणि कर्मचाऱ्यांनी दिलेला मानसिक आधार हा या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे पालकांनी सांगितले.

# जुन्नर तालुक्यातील ११५ लाभार्थी दिव्यांगांना साहित्य वाटप

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**



जुन्नर तालुक्यातील दिव्यांगांची तपासणी करून ११५ लाभार्थ्यांना कृत्रिम हात, पाय, कॅलिपर, बुट आदी साहित्य मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आले. जिल्हा दिव्यांग पुनवर्सन केंद्र पुणे व जुन्नर पंचायत समितीच्या वतीने ४ सप्टेंबर रोजी दिव्यांग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमला शेळकंदे उपसभापती अमित ढोले, सहाय्यक गटविकास अधिकारी महेश पाटील तसेच संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शिबिराचे उदघाटन करण्यात आले. सभापती शेळकंदे यांनी ३ दिव्यांगांच्या विविध अडचणी व घरपट्टीत ५० टक्के सुट ग्रामपंचायतीचा ५ टक्के निधी, घरकुल तसेच शासकीय योजना व दिव्यांगांना आवश्यक साहित्य मोफत वाटप आदी बाबत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी वलवकरच तालुक्यातील दिव्यांग सामाजिक संघटनेचे पदाधिकाऱ्या सोबत बैठक घेऊन सोडविण्यात येतील असे आश्वासन दिले.

यावेळी डॉ. रोहिणी कारंडे एस.आर. ट्रस्ट व डॉ. शुभ्रा कांबळे, ॲल्मिको राज शर्मा, शहारुख शहा यांच्या पथकाने दिव्यागं लाभार्थ्यांना तपासणी करून गरजूंना आवश्यक साहित्य वाटप केले.

आयटीसी संस्थेच्या वतीने वय १८ ते ४५ वयोगटातील महिला /पुरुष दिव्यांगांना दोन महीन्याचे मोफत संगणक कोर्स, प्रक्षिशणानंतर पाच हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यासाठी नाव नोंदणी करण्यात आली किरण टावरे, साक्षी शिन्दे, समाज कल्याण अधिकारी शंकर भालेराव, आरोग्य निरिक्षक संतोष आटोळे यांनी मार्गदर्शन केले.

श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण अध्यक्ष अरुण शेरकर, राष्ट्रवादी अपंग सेल अध्यक्ष पुष्पा गोसावी, डिसेंट फाऊंडेशनचे जितेंद्र बिडवई, गोविंद कुतळ, मच्छिंद्र थोरात, महेंद्र फापाळे निवुत्ती कामटकर, सौरभ मातेले, श्रीहरी नायकोडी, विजय शेळके, सविता दुराफे, ताहोर आत्तार, मुस्तकिम पिरजादा, युसुफ सय्यद, आरफात चौधरी, अनंत हाडवळे सामाजिक कार्यकर्ते व दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्टडी स्मार्टतर्फे १२ सप्टेंबर रोजी 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या पुण्यातील विद्यार्थ्यांना ६० हून अधिक आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची विनामूल्य संधी मिळणार आहे. स्टडी स्मार्टतर्फे १२ सप्टेंबर रोजी रॉयल कनॉट, बोट क्लब येथे 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या मेळाव्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे; अशी माहिती स्टडी स्मार्टचे व्यवस्थापकीय संचालक चेतन जैन यांनी पत्रकार परिषदेत दिली. अधिक माहिती देताना जैन म्हणाले, "आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या अनेक संधी विद्यार्थ्यांसमोर आहेत. मात्र, योग्य निर्णय घेण्यासाठी अचूक माहिती महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना आणि पालकांना विद्यापीठांशी थेट संवाद साधता यावा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे, हा मेळाव्याचा उद्देश आहे."

## डॉ. कीर्ती जाधव यांचे 'बाई तुझ्या अवकाशात' कवितासंग्रहाचे प्रकाशन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय (व्यवसाय अभ्यासक्रम)पौडरोड येथील प्राध्यापिका व कवयित्री डॉ. कीर्ती जाधव लिखित ' बाई तुझ्या अवकाशात ' कवितासंग्रहाचे प्रकाशन शुभहस्ते डॉ.केशव सखाराम देशमुख(जेष्ठ कवी, समीक्षक व सदस्य भाषा सल्लागार समिती महाराष्ट्र राज्य) व प्रमुख अतिथी अंजली कुलकर्णी(जेष्ठ कवयित्री व कार्यवाह,महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे) आणि डॉ. सुजाता शेणई(काव्यअभ्यासक व समीक्षक )तसेच गीतेश शिंदे (कवी,संपादक व प्रकाशक सृजनसंवाद),कवयित्री प्रा.डॉ.कीर्ती जाधव यांचे उपस्थित महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे येथे झाले. प्रत्येक बाईला तिच्या अवकाशाची जाणीव करून देणारा ' बाई तुझ्या अवकाशात ' हा कवितासंग्रह आहे असे प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी,समीक्षक डॉ.केशव सखाराम देशमुख म्हणाले.'बाई तुझ्या अवकाशात ' या संग्रहात डॉ.कीर्ती जाधव यांनी स्री विशिष्ट अनुभवातून स्त्रियांच्या सनातन दुःखाचे पापुद्रे उलगडले आहेत असे प्रमुख अतिथी ज्येष्ठ कवयित्री व महाराष्ट्र साहित्य परिषद चे कार्यवाह अंजली कुलकर्णी म्हणाल्या. बाईला तिच्या अवकाशाचे भान येवो यासाठी हा कवितासंग्रह प्रत्येकाने संग्रही ठेवावा असे काव्यअभ्यासक व समीक्षक डॉ. सुजाता शेणई म्हणाल्या.डॉ.कीर्ती जाधव यांच्या कविता दर्जेदार व प्रत्येकाला भावतील अशा असल्याने सृजनसंवाद प्रकाशन तर्फे प्रकाशित करताना आनंद होत आहे असे संपादक गीतेश शिंदे म्हणाले.तीन पिढ्यांचे वास्तव चित्रण या कवितासंग्रहात आहे असे डॉ.कीर्ती जाधव म्हणाल्या. कवितासंग्रहाचे उत्स्फूर्त स्वागत केल्याबद्दल कवयित्री कीर्ती जाधव यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील तसेच आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन चिन्मयी चिटणीस यांनी व आभार डॉ. अश्विनी दळवी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशांत पवार,हेमलता नवघणे, अथर्व जाधव यांनी विशेष सहकार्य केले.

## गणेशोत्सवातील अनधिकृत जाहिरातबाजीला आळा घाला; शहराचे विद्रुपीकरण थांबवा

### युवा सेनेचे पुणे महापालिका आयुक्तांना निवेदन; जाहिरातदारांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाईची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि सार्वजनिक ठिकाणी परवानगीविना तसेच नियमांचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणावर बॅनर, होर्डिंग्ज आणि जाहिराती लावल्या जात असल्याचा आरोप युवा सेनेने केला आहे. अनधिकृत जाहिरातबाजीमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून महापालिकेच्या महसुलाचेही नुकसान होत असल्याने संबंधित कंपन्या व जाहिरातदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी युवा सेनेचे पुणे महानगर अध्यक्ष हेमंत बागुल यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन दिले आहे. गणेशोत्सवाच्या काळात पुणेकरांच्या उत्सवावर नियमांचा बडगा उगारला जात असताना व्यावसायिक कंपन्यांच्या जाहिरातींकडे मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. काही कंपन्या आपल्या व्यावसायिक फायद्यासाठी सार्वजनिक जागांचा वापर करून मोठ्या प्रमाणावर जाहिरातबाजी करतात. मात्र, महापालिकेच्या जाहिरातविषयक नियमांचे पालन तसेच आवश्यक शुल्क भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेक ठिकाणी लावण्यात आलेले बॅनर आणि होर्डिंग्ज वाहतुकीस अडथळा निर्माण करण्याबरोबरच अपघाताला कारणीभूत ठरू शकतात. अशा जाहिरातींमुळे दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही बागुल यांनी उपस्थित केला आहे. अनधिकृत जाहिरातबाजी आढळल्यानंतर केवळ बॅनर काढण्याची औपचारिक कारवाई न करता संबंधित जाहिरातदार, कंपन्या आणि जबाबदार व्यक्तींवर दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करावी. तसेच जाहिरातीचे संपूर्ण शुल्क आणि त्यावरील दंड संबंधितांकडून वसूल करावा, अशी मागणी युवा सेनेने केली आहे.

## मोठ्या टॉक्सिक गोईटरमुळे श्वसनमार्गाला धोका

### मेडिकोव्हर हॉस्पिटलमध्ये ५४ वर्षीय महिलेवर शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



मोठ्या आकाराच्या टॉक्सिक मल्टिनोड्युलर गोईटर आणि दीर्घकाळापासून असलेल्या हायपरथायरॉईडीझममुळे त्रस्त असलेल्या ५४ वर्षीय महिलेवर मेडिकोव्हर हॉस्पिटल, भोसरी, पुणे येथे टोटल थायरॉइडेक्टॉमी शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. थायरॉईड ग्रंथीच्या वाढलेल्या आकारामुळे रुग्णेला श्रम करताना श्वास घेण्यास त्रास तसेच आवाजात बदल जाणवत होता. सुनीता फाटंगरे या रुग्णेला दीर्घकाळापासून हायपरथायरॉईडीझम असून त्यांच्यावर अँटी-थायरॉईड औषधोपचार सुरू होते. मात्र, कालांतराने थायरॉईड ग्रंथीचा आकार वाढून मोठा मल्टिनोड्युलर गोईटर तयार झाला. त्यासोबत श्वास घेण्यास त्रास आणि आवाजात बदल अशी लक्षणे दिसू लागल्याने मेडिकोव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला.

डॉ. आशिष शहुराव बांगर, कन्सल्टंट - सर्जिकल ऑन्कोलॉजी, यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. शिरीष शेळके, कन्सल्टंट - ईएनटी यांच्या सहकार्याने ही गुंतागुंतीची केस हाताळण्यात आली. एंडोक्रायनॉलॉजी, क्रिटिकल केअर आणि ॲनेस्थेशिया विभागाच्या टीमनेही उपचार प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. गोईटरचा मोठा आकार आणि संभाव्य श्वसनमार्गाच्या अडथळ्याचा धोका लक्षात घेऊन शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णेची सर्वंकष तपासणी करण्यात आली. थायरॉईड फंक्शनसह कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम व व्हिटॅमिन डीची तपासणी करण्यात आली. तसेच हृदयाची तपासणी आणि ॲनेस्थेशिया फिटनेसही करण्यात आला. रुग्णेवर टोटल थायरॉइडेक्टॉमी यशस्वीपणे करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर श्वसनमार्गावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी तिला मेडिकोव्हर हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. सुरुवातीला व्हेंटिलेटरी सपोर्ट देण्यात आला. नियोजित पद्धतीने व्हेंटिलेटरी सपोर्ट कमी करून रुग्णेला यशस्वीरीत्या एक्स्ट्युबेट करण्यात आले.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णेच्या आवाजात सुधारणा झाली आणि तिने प्रथम द्रवपदार्थ व त्यानंतर सॉफ्ट डायट घेण्यास सुरुवात केली. दरम्यान, हातांमध्ये मुंग्या येणे आणि Chvostek sign सकारात्मक आढळल्याने हायपोकॅल्सेमियाची सुरुवातीची लक्षणे ओळखण्यात आली. आयोनाइज्ड कॅल्शियमची तपासणी करून कॅल्शियम सप्लिमेंटेशन आणि कॅल्सिट्रिऑलद्वारे उपचार करण्यात आले. त्यानंतर रुग्णेची प्रकृती स्थिर राहिली.

ड्रेनचे प्रमाण कमी झाल्यानंतर तो काढण्यात आला. रुग्णेची जखम व्यवस्थित भरून आली असून आवाजात सुधारणा आणि आहार सहन करण्याची क्षमता समाधानकारक राहिल्याने तिला स्थिर स्थितीत डिस्चार्ज देण्यात आला. डॉ. आशिष शहुराव बांगर म्हणाले, "मोठ्या आकाराच्या टॉक्सिक मल्टिनोड्युलर गोईटरमध्ये, विशेषतः रुग्णाला श्वास घेण्यास त्रास किंवा आवाजात बदल यांसारखी लक्षणे असतील, तर शस्त्रक्रिया आणि श्वसनमार्गाच्या व्यवस्थापनासमोर आव्हाने निर्माण होऊ शकतात. अशा परिस्थितीत शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाचे योग्य नियोजन, विविध विभागांचा समन्वय आणि काळजीपूर्वक शस्त्रक्रिया महत्त्वाची ठरते. शस्त्रक्रियेनंतरही बारकाईने निरीक्षण करणे तितकेच आवश्यक आहे. या रुग्णेमध्ये कॅल्शियमची पातळी कमी होण्याची सुरुवातीची लक्षणे वेळीच ओळखून उपचार करण्यात आल्याने तिची प्रकृती समाधानकारकपणे सुधारली."

या प्रकरणातून मेडिकोव्हर हॉस्पिटल, भोसरी, पुणे येथे मोठ्या टॉक्सिक मल्टिनोड्युलर गोईटरच्या उपचारामध्ये बहुविभागीय समन्वय, शस्त्रक्रियेपूर्वीचे योग्य नियोजन, अचूक शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रियेनंतरचे काटेकोर निरीक्षण यांचे महत्त्व अधोरेखित होते.


## ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि. पुणे

इ-१ पेपर नोटिस क्र १ सन २०२६ - २०२७

ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी-१ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषदकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमूना ग्रामपंचायत दापोडी तालुका दौंड जिल्हा पुणे यांच्याकडून दिनांक ०९/०९/२०२६ ते दिनांक १५/०९/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ०९/०९/२०२६ ते दिनांक. १५/०९/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायतमध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभेदिवशी ग्रामपंचायतच्या सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा फि | इसारा रक्कम | ठेकेदाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | दापोडी गावांतर्गत बंदिस्त गटर करणे. | ३,००,०००/- | २००/- | सूट | सु.बे. अभियंता |
| २ | दापोडी येथे प्रवीण शेळके ते बाळू तांबे गटर करणे. | ३,००,०००/- | २००/- | सूट | सु.बे. अभियंता |
| ३ | दापोडी ग्रामपंचायत कार्यालय सुधारणा करणे. | २,५०,०००/- | २००/- | सूट | सु.बे. अभियंता |
| ४ | दापोडी येथे कलानगर अंगणवाडी सुधारणा करणे. | २,००,०००/- | २००/- | सूट | सु.बे. अभियंता |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फ्री ग्रामपंचायत दापोडी पीडीसीसी बँक शाखा केडगाव खाते क्रमांक ०२२००२५०००००१४ वर किंवा ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणेकामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत दापोडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा केडगाव खाते क्रमांक ०२२००२५०००००१४ च्या खाती भरण्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश डीडी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिकी लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिपप्पा उघडण्यात येईल. सदर निविदाबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करण्याचा तसेच कोणतीही निवादा स्विकारण्याचा व नाकारण्याचा सर्व अधिकार ग्रामपंचायत दापोडी यांनी राखून ठेवला आहे.

श्री. कालिदास शेलार — ग्रामपंचायत अधिकारी
श्री. आबासो. तुकाराम गुळमे — सरपंच

ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि.पुणे

# संगीत चिकित्सा क्षेत्रात पदविका अभ्यासक्रमाची नवी संधी

*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यतेने १५ सप्टेंबरपासून 'सुर संजीवन' पदविका अभ्यासक्रम*




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संगीत ही केवळ कला नाही, तर मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रभावी उपचारपद्धती आहे. ही बाब लक्षात घेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यतेने सूर संजीवन म्युझिक थेरपी ट्रस्टतर्फे 'सुर संजीवन (क्युरेटिव्ह म्युझिक)' हा संगीत चिकित्सा (म्युझिक थेरपी) पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. १५ सप्टेंबरपासून या अभ्यासक्रमाला सुरुवात होत असून, याविषयी संगीतसाधकांना अधिक माहिती व्हावी, यासाठी येत्या रविवारी (ता. १३) सायंकाळी ५ ते ७ यावेळेत कर्नाटक संघ, दुसरा मजला, सिद्धार्थ टॉवर्स, कोथरूड पुणे येथे संगीतविषयक विनामूल्य सेमिनारचे आयोजन केले आहे, अशी माहिती सूर संजीवन म्युझिक थेरपी ट्रस्टचे संस्थापक व ज्येष्ठ सतारवादक डॉ. पं. शशांक कट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. पं. शशांक कट्टी म्हणाले, "संगीत ही एक प्रभावी उपचारपद्धती आहे. या अभ्यासक्रमातून वैज्ञानिक आधारावर संगीत चिकित्सेचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल. संगीताच्या माध्यमातून अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची ही संधी आहे. हा अभ्यासक्रम जगभरात ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध आहे, तसेच पुणे आणि मुंबई येथे ऑफलाइन स्वरूपातही उपलब्ध असणार आहे. एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे (शासकीय मान्यताप्राप्त) पदविका प्रमाणपत्र मिळेल. त्यामुळे त्यांच्या करिअरच्या उत्तम संधी निवडण्यास मदत होईल. संगीत क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच डॉक्टर, समुपदेशक, विशेष बालशिक्षक, मानसोपचारतज्ज्ञ आणि समाजकार्य क्षेत्रातील व्यावसायिकांसाठीही हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. संगीताच्या माध्यमातून आरोग्य, समतोल आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणारा 'सुर संजीवन' अभ्यासक्रम हा वास्तवात उपचारक संगीत क्षेत्रात नवा अध्याय ठरेल, अशी अपेक्षा आहे."

# महिला शक्तीचा जागर : वार्षिक सभा उत्साहात



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

महिलांच्या आर्थिक, सामाजिक व सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या परीस महिला प्रभागसंघ, लिंगाळी-मलठण प्रभागाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, बचत गटांच्या सदस्यांनी उभारलेले विविध उत्पादनांचे आकर्षक स्टॉल आणि मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे सभेला विशेष रंगत आली.

सभेनिमित्त महिला बचत गटांच्या सदस्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे आकर्षक स्टॉल उभारण्यात आले होते. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवलबाबा कृष्णराव जगदाळे यांनी स्टॉलची पाहणी करून महिला सदस्यांशी संवाद साधला. महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांची माहिती जाणून घेत त्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवलबाबा कृष्णराव जगदाळे, जिल्हा परिषद सदस्य साहेबराव राजाराम पोळ, पंचायत समिती सदस्य सुमनताई सुरेश निकाळजे, सहाय्यक गटविकास अधिकारी भालेराव साहेब, बाजार समितीचे अध्यक्ष कदम सर, पंचायत समिती दौंडच्या बीएमएम राणी ननवरे मॅडम, बीएमएम-एफआय सचिन आटोळे तसेच सीसी स्वप्नील सुर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी परीस महिला प्रभागसंघाचा वार्षिक अहवाल सादर करण्यात आला. वर्षभरात प्रभागसंघाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. आलेगाव येथील गटशेती करणाऱ्या महिलांनी गटशेतीचे नियोजन, त्याचे फायदे आणि महिलांनी एकत्रितपणे शेतीच्या माध्यमातून आर्थिक प्रगती कशी साधावी, याबाबत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

सामूहिक प्रयत्नांतून महिलांनी स्वावलंबी होऊन आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमास परीस महिला प्रभागसंघाच्या अध्यक्षा मनीषा जगताप, सचिव अपर्णा गवळी, प्रभागसंघ व ग्रामसंघांचे पदाधिकारी, ग्रामसखी, पशुसखी तसेच प्रभागसंघाच्या लिपिका राणी जाधव मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी ग्रामसखी पूजा पोळ (देऊळगाव राजे), दिपाली ढवळे (हिंगणे बेर्डे), शैला जाधव (आलेगाव), सुहिता होले (गोपाळवाडी), गीता गोसावी (खोरवडी), रोहिणी साबळे (लिंगाळी), भारती धगाटे (मलठण), वर्षा डाळिंबे (शिरापूर), रेखा डोंगरे मॅडम तसेच बँक सखी शीला जाधव मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन पूजा सचिन पोळ यांनी केले. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, महिला उत्पादकांनी उभारलेले विविध स्टॉल, गटशेतीविषयी झालेले मार्गदर्शन आणि मान्यवरांचे प्रेरणादायी विचार यामुळे परीस महिला प्रभागसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाली

## थोडक्यात पण महत्वाचे

### बोरोप्लसचा बेबी केअर क्षेत्रात प्रवेश; 'FromMaa' अंतर्गत नवीन रेंज लाँच



कोलकाता (आरंभ पर्व) : आईच्या प्रेमाचा स्पर्श, नैसर्गिक घटकांची समृद्धी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत एफएमसीजी क्षेत्रातील प्रमुख कंपनी ईमामी लिमिटेडच्या स्किनकेअर ब्रँड बोरोप्लसने 'बोरोप्लस FromMaa' या नवीन बेबी केअर रेंजचे लाँच करण्याची घोषणा केली आहे. आजच्या पिढीतील आई-वडिलांच्या गरजा लक्षात घेऊन ही रेंज विकसित करण्यात आली असून, बाळांच्या कोमल त्वचेची निगा राखण्यासाठी विशेष फॉर्म्युलेशनचा वापर करण्यात आला आहे. 'With Love, From Maa' या संकल्पनेवर आधारित या रेंजमध्ये आईचे प्रेम, काळजी आणि संरक्षणाची भावना आधुनिक बेबी केअर सोल्यूशन्ससोबत जोडण्यात आली आहे. बाळाच्या त्वचेची कोमलता आणि पोषण लक्षात घेऊन उत्पादनांमध्ये मामरा आल्मंड, काश्मिरी केशर आणि मिल्क प्रोटीन यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश करण्यात आला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, बोरोप्लस FromMaa रेंजमधील उत्पादने बालरोगतज्ज्ञांकडून मंजूर असून त्वचारोगतज्ज्ञांद्वारे त्यांची चाचणी करण्यात आली आहे. त्यामुळे नैसर्गिक घटकांसोबत तज्ज्ञांचा विश्वास आणि आधुनिक फॉर्म्युलेशनचा समन्वय साधण्याचा प्रयत्न या उत्पादनांमधून करण्यात आला आहे.

### सिंहगड रोड, दत्तवाडी व मुंढवा वाहतूक विभागाअंतर्गत वाहतूक मार्गात बदल

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड, दत्तवाडी व मुंढवा वाहतूक विभागाअंतर्गत वाहतूक मार्गात बदल करण्यात येणार असून त्याबाबत नागरिकांच्या काही सूचना असल्यास पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफिस, बंगला नंबर ६, एअरपोर्ट रोड, पुणे यांच्या कार्यालयात २१ सप्टेंबर पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. या बदलांतर्गत भूमकर चौक, सर्व्हिस रस्त्याने स्वामीनारायण मंदिराकडे जाणाऱ्या वाहनांना व स्वामीनारायण मंदिराकडून भुमकर चौकाकडे जाण्यासाठी मंदिराच्या डाव्या बाजूने जाणारा सेवा रस्त्यावर एकेरी मार्ग करण्यात येणार आहे. तसेच स्वामीनारायण मंदिराच्या समोरील बाजूस असलेला सेवा रस्ता जोडणाऱ्या पुलावर फक्त भुमकर चौकाकडून स्वामीनारायण मंदिराकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश राहील. स्वामीनारायण मंदिराकडून येणाऱ्या वाहनांना या पुलावर नो एन्ट्री करण्यात येत आहे. वाहनांनी मंदिराच्या डाव्या बाजूकडील सर्विस रोड एकेरी मार्गाचा वापर करून भूमकर चौकाकडे जावे. वाहनांना एकेरी मार्ग करण्यात येत आहे. दत्तवाडी वाहतूक विभागाअंतर्गत एस. पी. एम. पब्लिक इंग्लिश मीडियम स्कूल, सदाशिव पेठ समोरील रस्त्यावर ५० मीटर पी-१ व पी-२ पार्किंग करण्यात येणार आहे. तसेच मुंढवा वाहतूक विभाग अंतर्गत आर्मी गेट व मेरिट सूट येथील राईट टर्न बंद करण्यात येणार आहे, असे पोलीस उप-आयुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी कळविले आहे.

### जुन्नरला नगरसेवकांविरुद्ध खंडणीच्या गुन्ह्यामुळे खळबळ

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर नगर परिषदेच्या विद्यमान दोन नगरसेवक तसेच दोन नगरसेविकांचे पती अशा चौघांविरुद्ध खंडणीप्रकरणी जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ह्या घटनेमुळे तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. संबंधित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असल्याचे समजते. याबाबत व्यवस्थापक मुकुंद रत्नाकर डोंगरे यांनी जुन्नर पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे .जुन्नरमधील नंदनवन सोसायटीमध्ये २६ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान गाडेकर इंटरप्राईजेस कंपनीस काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट)मध्ये टाकण्याची धमकी देऊन नगरसेवक प्रशांत सराईकर व वाजीद इनामदार तसेच सोहेल शेख व गणेश पातुरकर यांनी धमकी देऊन चार लाखाची खंडणी वसूल केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. सोहेल शेख हे नगरसेविका सना शफी मन्सूर यांचे तर गणेश पातुरकर हे नगरसेविका अनुजा पातुरकर यांचे पती आहेत. सदर प्रकरणात अन्य चार नगरसेवकांचा ह्या गुन्ह्यात सहभाग तपासण्यात यावा अशी विनंती फिर्यादी कडून पोलिसांना करण्यात आली आहे आरोपी विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०८(२) ३५१(२) ३(५)प्रमाणे गुन्हा गुन्हा दाखल झाला आहे .गाडेकर इंटरप्राईजेस कंपनीला जुन्नर नगरपालिकेने कुशल व अकुशल कामगार पुरविण्याचे कंत्राट दिले होते .याबाबत अनेक तक्रारी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे नगरसेवक प्रशांत सराईकर नगरसेवक वाजिद इनामदार सोहेल शेख , गणेश पातुरकर यांनी तुमची एजन्सी ब्लॅकलिस्ट मध्ये टाकू अशी धमकी देऊन या एजन्सीचे मॅनेजर मुकुंद डोंगरे यांच्याकडून सुमारे चार लाख रुपये खंडणी वसूल केली असे फिर्यादीत नमूद केले आहे.

# शिक्षणासाठीच्या संघर्षाची संवेदनशील गोष्ट दाखवणारा 'भाटा'




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळातही काही समाज घटक शिक्षणापासून वंचित आहेत. याच वंचित घटकापैकी एक असलेल्या बेलदार समाजातील एक संवेदनशील कहाणी आता मोठ्या पडद्यावर येत आहे. बेलदार समाजाचा इतिहास उलगडत शिक्षणासाठीच्या संघर्षाची गोष्ट भाटा या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार असून, उत्कृष्ट स्टारकास्ट असलेला हा चित्रपट ११ सप्टेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे.

व्ही. डि. एंटरटेनमेंट आणि मोरया उद्योग समूह यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली असून अरायव्हल स्टुडिओ प्रा. लि. या निर्मिती संस्थेने "भाटा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सुनील आबा जाधव आणि विजय चंद्रकांत चव्हाण हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. रिजवान शेख, मितेश पराडकर, सुनील सुनील कातकर हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. भरतराज नारायण यादव यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा विजय चंद्रकांत चव्हाण यांची आहे, तर पटकथा आणि संवाद शरद कारंडे यांचे आहेत. श्रेयस आंगणे यांनी चित्रपटाची गाणी लिहिली असून संगीतही त्यांचेच आहे तर छायाचित्रण हरेश सावंत यांचे आहे. .सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, अभिनेते अरुण नलावडे, प्रशांत मोहिते अभिनेत्री रुपाली जाधव, विजय कदम, अनिल नगरकर, लक्ष्मण दावभट, ऋषभ जाधव, प्रेमा किरण बालकलाकार तनिष्का जाधव यांचा दमदार अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे.

पारंपरिक समाजरचनेत प्रत्येक समाजघटकाच्या कामाचे स्वरुप निश्चित केलेले होते. मात्र, बदलत्या काळानुसार ही परिस्थिति बदलत गेली आणि नवी पिढी नवी स्वप्ने पाहू लागली. मात्र, अजूनही बेलदार समाजासारख्या घटकांतील अनेक मुले शिक्षणापासून वंचित राहतात. याच समाजातील एक संवेदनशील गोष्ट भाटा या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. पिढ्यानपिढ्या दगड फोडत जगणाऱ्या बेलदार समाजातील एक बाप आपल्या मुलांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचं स्वप्न पाहतो. गरिबी, परिस्थिती आणि समाजाच्या पारंपरिक विचारांविरोधात उभा राहून आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगलं भविष्य देण्यासाठी संघर्ष करणाऱ्या बापाची गोष्ट भाटा या चित्रपटात मांडण्यात आला आहे. शिक्षण, नव्या पिढीची स्वप्ने, प्रथा-परंपरा या माध्यमातून एक वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न दिग्दर्शकानं केला आहे. त्याशिवाय बेलदार समाजाचा इतिहास उलगडण्याचा प्रयत्नही या चित्रपटातून पहिल्यांदाच करण्यात आला आहे. चित्रपटाच्या उत्सुकता वाढवणाऱ्या टीजरनंतर आता चित्रपटाचा प्रभावी ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. या ट्रेलरला समाजमाध्यमातून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाची संकल्पना, ट्रेलरचं कौतुकही होत आहे. त्यामुळे या चित्रपटाला नक्कीच प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळणार आहे.

## प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्सतर्फे 'द्रोणाचार्य दिन २०२६' उत्साहात शिक्षकांच्या योगदानाला अभिवादन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्सचा वार्षिक शिक्षक दिन सोहळा 'द्रोणाचार्य दिन २०२६' चिखली येथील टाऊन हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव या कार्यक्रमातून करण्यात आला. प्रियदर्शनी परिवारातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते 'अनुभव' या विशेष संग्रहाचे प्रकाशन. प्रियदर्शनीच्या विविध शाखांतील शिक्षकांनी अनुभवलेल्या वास्तव जीवनातील घटना, आठवणी, भावना आणि त्यांच्या व्यावसायिक प्रवासातील प्रेरणादायी प्रसंग या संग्रहातून मांडण्यात आले आहेत. या माध्यमातून शिक्षकांच्या कार्यामागील मानवी आणि भावनिक पैलूंना उजाळा देण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी व्हिडिओ संदेशांच्या माध्यमातून आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देताना शिक्षकांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे स्मरण या संदेशांतून करण्यात आले. संस्थेचे संस्थापक कै. श्री. इंद्रमन सिंग यांच्या दूरदृष्टीला यावेळी अभिवादन करण्यात आले. सर्वांसाठी सुलभ, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि युवक सक्षमीकरणाचे त्यांनी पाहिलेले स्वप्न आजही प्रियदर्शनीच्या शैक्षणिक वाटचालीचा आधार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## पतीचा खून करणाऱ्या माजी सैनिकाने केली आत्महत्या

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

पत्नीचा खून करून मुलाच्याही खुनाचा प्रयत्न करून फरारी झालेल्या आरोपी माजी सैनिकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना येथे उघडकीस आली. मृत आरोपी महेंद्र शिवाजी दौंडकर (वय ४५, रा. संगम गार्डन, वाडा रस्ता, राजगुरुनगर) याचा मृतदेह चांडोली गावच्या हद्दीत भीमा नदीकाठी आढळून आला.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने नदीकाठच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली आहे. दौंडकर याने रविवारी (दि. ३० ऑगस्ट) रात्री बहिणीशी बोलत नसल्याच्या रागातून पत्नी दिपा दौंडकर (वय ४०) यांचा गळा आवळून खून केला होता. त्यानंतर घटनेचा आरडाओरडा करणाऱ्या १७ वर्षीय मुलावरही चाकूने वार करून त्यालाही जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आणि आरोपी फरार होता. पोलीस त्याचा शोध घेत असतानाच त्याचा मृतदेह आढळल्याने या घटनेचा शेवट आरोपीच्या आत्महत्येने झाला.

# बझबॉल्झची महाराष्ट्रात एन्ट्री; पुण्यात उपलब्ध

- १५% ABV आणि चार हटके फ्लेवर्ससह बझबॉल्झची नवीन रेंज
- 'जामुन मिंट पॉप'चा समावेश




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रंगीत आणि सहज ओळखता येणाऱ्या गोल आकाराच्या पॅकेजिंगसह विविध हटके फ्लेवर्ससाठी प्रसिद्ध असलेले बझबॉल्झ हे रेडी-टू-ड्रिंक फ्लेवर्ड अल्कोहोलिक पेय आता महाराष्ट्रात दाखल झाले आहे. 'पॉप. सिप. बझ.' या संकल्पनेवर आधारित हे पेय सध्या पुण्यात उपलब्ध झाले असून, सप्टेंबरअखेरीस मुंबईतही उपलब्ध होणार आहे. भारतामध्ये डिसेंबर २०२५ मध्ये बंगळुरूमधून लॉन्च झाल्यानंतर मिळालेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर बझबॉल्झने मे २०२६ मध्ये गोव्यात प्रवेश केला. आता महाराष्ट्रातील पुणे आणि मुंबई या प्रमुख शहरांमध्ये विस्तार करत कंपनीने देशातील आपली उपस्थिती आणखी मजबूत केली आहे. बझबॉल्झचे प्रेसिडेंट जेस शीरहॉर्न म्हणाले, "भारतामध्ये बझबॉल्झला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. महाराष्ट्रात प्रवेश करण्यासाठी आम्ही विशेष उत्सुक होतो. भारतीय प्रौढ ग्राहकांना कॉकटेलचा वेगळा आणि सोयीस्कर अनुभव घेण्याची इच्छा असल्याचे आम्हाला दिसून येत आहे. पुण्यातील लॉन्चनंतर सप्टेंबरअखेरीस मुंबईतही बझबॉल्झ उपलब्ध होईल. महाराष्ट्रातील रिटेलर्स आणि वितरकांकडून मिळणारा उत्साह तसेच सोशल मीडियावरील ग्राहकांच्या प्रतिसादामुळे आम्हाला मोठे प्रोत्साहन मिळाले आहे." पुणे आणि मुंबईचा समावेश झाल्यानंतर एका वर्षापेक्षा कमी कालावधीत बझबॉल्झ तीन राज्यांतील चार शहरांमध्ये उपलब्ध झाला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, आकर्षक पॅकेजिंग, वेगळे फ्लेवर्स आणि सोयीस्कर आकार यामुळे ब्रँडला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रात बझबॉल्झचे १८० मिलीचे गोल आकाराचे पॅक उपलब्ध असून, त्यात १५% अल्कोहोलचे प्रमाण (ABV) आहे.

या उत्पादनाची किंमत १२५ रुपये आहे. भारतीय ग्राहकांच्या आवडी लक्षात घेऊन फ्लेवर्स विशेषतः भारतासाठी विकसित करण्यात आल्याचे कंपनीने सांगितले.

# किल्ले शिवनेरीवर महादेव कोळी चौथरा अभिवादन सोहळा




**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

स्वराज्य प्राप्तीसाठी सोळाशे महादेव कोळीवीरांनी केलेल्या बलिदानाच्या प्रित्यर्थ किल्ले शिवनेरीवरील महादेव कोळी स्मारकाजवळ रविवार दि. ६ सप्टेंबर रोजी महादेव कोळी चौथरा अभिवादन सोहळा संपन्न झाला.

यावेळी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या आदिवासी समाज बांधवांनी ह्या थोरवीरांना श्रद्धांजली अर्पण केली. वीर क्रांतिकारकांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या कार्याची व पराक्रमाची माहिती सांगितली. यावेळी प्रा. चिंतामणी यांनी आदिवासी समाज व चळवळी दिशा यावर तसेच इतिहास अभ्यासक प्रा. संजय साबळे यांनी आदिवासी विचारधारा व समस्याबाबत मार्गदर्शन केले. आदिवासी गायक विक्रम कवठे स व गीतकार जगनभाऊ खोकले यांनी शूरवीरांचा पोवाडा व गीते सादर केली. आमदार शरद सोनवणे व सभापती कमल शेळकंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. शिवाजी महाराज चौक ते किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापर्यंत मशाल पदयात्रा व आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या पुतळ्याची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी राज्यातील आदिवासी समाजाचे नेते, कार्यकर्ते व समाज बांधव उपस्थित होते

इतिहासामध्ये स्वराज्य प्राप्तीसाठी महादेव कोळी समाजाने अनेक उठाव केले. मोगलांविरुद्ध अनेक वेळा निकराची झुंज दिली. वीर खेमा नाईक यांच्या नेतृत्वाखाली मोठा लढा उभारला. महादेव कोळ्यांच्या वाढत्या कारवाया लक्षात घेऊन शहाजान बादशहाने मोठी कुमक पाठवून स्वराज्यासाठी चाललेल्या मंडळींच्या बंदोबस्त केला. हजारो महादेव कोळ्यांची धरपकड करून त्यांना दहशत बसवण्यासाठी जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यावर सोळाशेहुन अधिक महादेव कोळी वीरांचे शिरस्त्राण करण्यात आले व मुंडक्यांचा ढीग करून त्यावर चबुतरा बांधण्यात आला.

यावेळी मुघलांचा सरदार अरणदुला खान होता समुदायिक कत्तलीच्या या चौथऱ्याचे नोंद इतिहासात काळा चौथरा म्हणून झाली पण त्याचे सार्थ नाव महादेव कोळी चौथरा अशी आहे. या चौथऱ्याचा उल्लेख इंग्रजांच्या मुंबई,ठाणे,पुणे या गॅझेटमध्ये आहे.स्वराज्याच्या लढाईमध्ये आदिवासी बांधवांचे फार मोठे योगदान राहिले आहे. ह्या शूरवीरांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी त्यांना अभिवादन करण्यासाठी राज्यातील महादेव कोळी समाजाने उपस्थित राहून अभिवादन केले.यावेळी माळीण येथील लेंबे व कचरे मॅडम, अकोलेचे भांगरे मोखाडा येथील पावरा यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित तुळशीराम भोईर,विठ्ठल भोईर,दत्ताभाऊ गवारी, काळूदादा शेळकंदे, सरपंच महादू निर्मळ, मंगेश आढारी, संतोष तळपे, शुभम उंडे, चैत्राली केंगले, सिमा रघतवान, शुभम भवारी, संदीप भाऊ लोटे मनोहर कारोटे मोहन नाडेकर,अंकुश दाते, सुनील विरणक,अंकुश गवारी, प्रा. संजय मेमाणे, सागर मुठे, विविध आदिवासी नेते सामाजिक कार्यकर्ते विविध सरपंच उपस्थित होते त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य विविध संघटनांनी सहकार्य केले यात सह्याद्री आदिवासी कोळी महादेव जमात संघटना, अंबरनाथ महादेव कोळी समाज संघटना, कर्जत एक आदिवासी लाख आदिवासी संघटना, पालघर यांचं विविध अन्नदाते दानशूर समाज बांधव यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन लांडे यांनी केले तर आभार सुभाष मोहरे यांनी मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.